# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/04/2023 (मंगळवार) सकाळ


### अवैधरीत्या देशी विदेशी दारुची वाहतुक करणारा आरोपी अटक
### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक १७/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन बुट्टीबोरी हद्दीतील सावंगी ते वर्धा रोडने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, सावंगी ते वर्धा रोड येथुन एक इसम आपल्या ताब्यातील चारचाकी वाहनात अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सावंगी ते वर्धा रोड येथे नाकाबंदी केली असता एम. एच.–३२/ए. एस.–५९८५ क्रमांकाची एक मारूती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार येतांना दिसली. सदर कारला थांबवुन पाहणी केली असता **आरोपी नामे– आकाश उर्फ छगन अजय मोटघरे, वय २४ वर्ष, रा. रामनगर जि. वर्धा** याने अवैधरित्या १) ऑफिसर चॉईस कंपनीच्या ०६ पेटया ज्यामध्ये प्रत्येकी १८० एम. एल. प्रमाणे विदेशी दारूच्या २८८ निपा किमंती अंदाजे ५७,६००/– रू. २) टॅंगो कंपनीच्या देशी दारूच्या ०४ पेटया ज्यामध्ये ९० एम. एल. देशी दारूच्या ४०० निपा किंमती अंदाजे २०,०००/–रू. ३) टुबर्ग कंपनीच्या बिअरच्या ०२ पेटया ज्यामध्ये ६५० एम. एल. च्या २४ बिअर किंमती अंदाजे ४८००/–रू. चा मुद्देमाल वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातुन ४) एक मारूती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार क्र. एम. एच.–३२/ए. एस.–५९८५ किंमती अंदाजे ७,००,०००/–रू. असा एकुण वाहनासह ७,८२,४००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ६५ (अ) (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. आरोपीला जप्त मुद्देमाल व कागदपत्रासह पुढील कायदेशीर प्रक्रीयेसाठी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, महेश जाधव, पोलीस नायक मयुर ढेकळे, अमृत किनगे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




## घरफोडी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा खात येथे दिनांक १६/०४/२०२३ चे ०९.०० वा. ते १७/०४/२०२३ चे रात्री १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– भोजराज सिताराम राखडे, वय ६५ वर्ष, रा. खात ता. मौदा जि. नागपुर यांच्या शेतातील घरात ठेवले असलेले तांदळाचे १० कट्टे किंमती अंदाजे १५०००/– रु. व तुरीचे अडीच क्वींटल पिक किंमती १००००/– रु असा एकुण किंमती अंदाजे २५,०००/– रु कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. टिकाराम जाधव पोस्टे अरोली मो. नं. ८८३०९६५३४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर